कृषि विभागाच्या जिल्हा परिषदेकडील
पदांचा आढावा
सुधारित आकृतिबंध

**महाराष्ट्र शासन**
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.
शासन निर्णय क्रमांक- आकृवि- १२०८ /प्र.क्र.८७/१५अे
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२
दिनांक - ९ ऑगस्ट ,२०११.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.आकृवि १२०८/प्र.क्र.७२/१५अे, दि.२२.५.२००९.
२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.एपिटी १००१/ प्र.क्र.९६०/आस्थापना-८, दि.२७.६.२००३
३) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा दि.१०.९.२००१.

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाच्या दि.१० सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये सर्व विभागातील पदांचा आढावा घेण्याबाबत सुचित करण्यात आले होते. त्यानुसार ग्रामविकास विभागाने गट-क व गट-ड संवर्गातील पदांचा आढावा घेवुन दि.२७.६.२००३ नुसार १२५१ पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित केला आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेअंतर्गत गट-क मधील कृषि अधिकारी या संवर्गातील पदे समाविष्ट नाहीत. तसेच, कृषि विभागातील कृषि आयुक्तालय ते क्षेत्रीयस्तरापर्यंतच्या कार्यालयांचा सुधारित आकृतिबंध कृषि विभागाच्या दि.२२.५.२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित केला असुन जिल्हा परिषदेकडील कृषि विभागातील पदांचा आढावा स्वतंत्ररित्या घेण्याबाबत संयुक्त सचिव समितीने सुचित केले होते. त्यास अनुसरुन जिल्हा परिषदेकडील कृषि विभागाच्या गट-क व गट-ड संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषदेकडील कृषि विभागातील पदांच्या आढाव्यास मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने दि.२१ जुलै २०११ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. सदर बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे आस्थापना अनुदान योजनेअंतर्गत नवीन १४१ कृषि अधिका-यांची पदे निर्माण करण्यात येत आहेत.सदरची नविन पदे संबंधित जिल्हा परिषदांनी ६ महिन्यात भरणे बंधनकारक आहे.

२. त्यामुळे आता आस्थापना अनुदान योजनेअंतर्गत कृषि अधिकारी संवर्गातील पुर्वीची मंजुर २१० आणि नवीन १४१ मिळुन कृषि अधिका-यांची ३५१ पदे व प्रत्येक जिल्हा परिषदेस एक वाहन चालक याप्रमाणे एकुण ३३ पदे राहतील. तसेच विशेष घटक योजने अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या कृषि अधिका-यांच्या २८९ पदांचा तपशिल **परिशिष्ट अ** मध्ये नमुद करण्यात आला आहे. विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थी व कामे लक्षात घेऊन मंजुर कृषि अधिका-यांचे जिल्हानिहाय पुर्नवाटप संबंधित जिल्हा परिषदेने करावे. संयुक्त सचिव समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील आस्थापना अनुदान योजना व विशेष घटक योजना अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या ९९८ पदांपैकी ३२५ पदे समर्पित करण्यात येत आहे. समर्पित करण्यात येत असलेल्या पदांचा तपशिल **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविण्यात आला आहे.सुधारित आकृतीबंधामुळे अतिरिक्त ठरणा-या कर्मचा-यांबाबत वित्त विभागाच्या विहित धोरणाप्रमाणे उचित कार्यवाही ग्रामविकास व जलसंधारण विभागाने करावी.

३. उपरोक्त नमद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील आस्थापना अनुदान योजना व विशेष घटक योजनेच्या एकुण ९९८ इतक्या कार्यरत पदांच्या आढाव्यांअंती ३२५ पदे समर्पित करुन आस्थापना अनुदान योजनेकरिता ३८४ व विशेष घटक योजनेकरिता २८९ अशा एकुण ६७३ पदांच्या सुधारित आकृतिबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदरचे आदेश उच्च स्तरीय सचिव समितीने दि.२१.७.२०११ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थावर www.maharashatra.gov.in उपलब्ध असुन त्याचा संगणक सांकेतांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( संदिप ढाकणे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे-१

Pinjari
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद पालघर.

सर्व विभागीय आयुक्त (महसुल )
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय कृषि सहसंचालक
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा),/मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
सर्व उप विभागीय कृषि अधिकारी (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
सर्व तालुका कृषि अधिकारी (द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे)
वित्त विभाग, मंत्रालय, मुबंई-३२.
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती/१५अे

आकृति १२०८/प्र.क्र.८७/१५ अं. दि.९/८/२०११ सोबतचे परिशिष्ट-अ

| अ.क्र. | संवर्ग | योजना | कृषि आयु. | ठाणे | रायगड | रत्नागिरी | सिंधुदुर्ग | नाशिक | धुळे | नंदुरबार | जळगाव | अहमदनगर | पुणे | सातारा | सांगली | सोलापूर | कोल्हापूर | औरंगाबाद | जालना | परभणी | हिंगोली | बीड | नांदेड | उस्मानाबाद | लातूर | बुलढाणा | अकोला | वाशिम | अमरावती | यवतमाळ | वर्धा | नागपूर | भंडारा | गोंदिया | चंद्रपूर | गडचिरोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ |
| १ | कृषि अधिकारी | शासन अनु. योजना | 0 | 13 | 15 | 9 | 8 | 15 | 4 | 6 | 15 | 14 | 13 | 11 | 10 | 11 | 12 | 9 | 8 | 9 | 5 | 11 | 16 | 8 | 10 | 13 | 7 | 6 | 14 | 16 | 8 | 13 | 7 | 8 | 15 | 12 | 351 |
| | | जि.प. चे स्वीय उत्पन्न | 0 | 13 | 11 | 9 | 7 | 13 | 4 | 6 | 12 | 12 | 13 | 9 | 8 | 11 | 11 | 6 | 5 | 5 | 2 | 7 | 8 | 6 | 5 | 13 | 7 | 6 | 13 | 15 | 8 | 13 | 6 | 7 | 10 | 8 | 289 |
| | | एकूण | 0 | 26 | 26 | 18 | 15 | 28 | 8 | 12 | 27 | 26 | 26 | 20 | 18 | 22 | 23 | 15 | 13 | 14 | 7 | 18 | 24 | 14 | 15 | 26 | 14 | 12 | 27 | 31 | 16 | 26 | 13 | 15 | 25 | 20 | 640 |
| २ | वाहन चालक | शासन अनुदान योजना | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 33 |
| | | जि.प. चे स्वीय उत्पन्न | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | एकूण | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 33 |
| | एकूण १ ते २ या केडरचे | शासन अनु. योजना | 0 | 14 | 16 | 10 | 9 | 16 | 5 | 7 | 16 | 15 | 14 | 12 | 11 | 12 | 13 | 10 | 9 | 10 | 6 | 12 | 17 | 9 | 11 | 14 | 8 | 7 | 15 | 17 | 9 | 14 | 8 | 9 | 16 | 13 | 384 |
| | | जि.प. चे स्वीय उत्पन्न | 0 | 13 | 11 | 9 | 7 | 13 | 4 | 6 | 12 | 12 | 13 | 9 | 8 | 11 | 11 | 6 | 5 | 5 | 2 | 7 | 8 | 6 | 5 | 13 | 7 | 6 | 13 | 15 | 8 | 13 | 6 | 7 | 10 | 8 | 289 |
| | एकूण केडर | एकूण | 0 | 27 | 27 | 19 | 16 | 29 | 9 | 13 | 28 | 27 | 27 | 21 | 19 | 23 | 24 | 16 | 14 | 15 | 8 | 19 | 25 | 15 | 16 | 27 | 15 | 13 | 28 | 32 | 17 | 27 | 14 | 16 | 26 | 21 | 673 |

Pinjari

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

आकृवि १२०८/प्र.क्र.८७/१५अे, दि.९/८/२०११ सोबतचे परिशिष्ट-ब

| अ.क्र. | संवर्ग | आकृतिबंधापुर्वीची कार्यरत पदे | | | सुधारित आकृतीबंधानुसार मंजुर | | समर्पित करण्यात येणारी पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आस्थापना अनुदान योजना | विशेष घटक योजना | एकुण | आस्थापना अनुदान योजना | विशेष घटक योजना | |
| १ | २ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | जिल्हा कृषि अधिकारी | ० | २६ | २६ | ० | ० | २६ |
| २ | कृषि अधिकारी | २१० | २८९ | ४९९ | ३५१ | २८९ | १४१ |
| ३ | सहायक अधिक्षक | ० | १ | १ | ० | ० | १ |
| ४ | सहाय्यक लेखा | ० | २७ | २७ | ० | ० | २७ |
| ५ | वरिष्ठ सहायक लेखा | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वरिष्ठ सहायक जनरल | ३३ | २९ | ६२ | ० | ० | ६२ |
| ७ | लघु टंकलेखक | ० | १ | १ | ० | ० | १ |
| ८ | लिपिक | २२२ | ० | २२२ | ० | ० | २२२ |
| ९ | जिपचालक | ६० | ० | ६० | ३३ | ० | २७ |
| १० | यांत्रिक | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | परिचर/ शिपाई | ९९ | १ | १०० | ० | ० | १०० |
| १२ | पहारेकरी | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १३ | क्लिनर | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | वेमन (तोलारी ) | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण | ६२४ | ३७४ | ९९८ | ३८४ | २८९ | ३२५ |

Pinjari

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद पालघर